| | |
|---|---|
| MHOS040016222025 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४९०/२०२५**<br>**सरुबाई व इतर वि. निरंक** |

**निशाणी क्रमांक १ वरील आदेश**

**१.** प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सादर केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

**२.** अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत **लक्ष्मण नामदेव कानडे** यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी, तर अर्जदार क्र. २ व ३ ही मुले आहेत. मयत **लक्ष्मण नामदेव कानडे हे दिनांक ३१/०५/२०२५** रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव जि. धाराशिव येथे मयत झाले आहेत. मयत **लक्ष्मण नामदेव कानडे** यांचा कायमचा पत्ता मौजे तीर्थ ता. तुळजापुर, जि. धाराशिव आहे. मयत **लक्ष्मण नामदेव कानडे** यांची आई नामे पगाबाई नामदेव कानडे यादेखील आधीच मयत झाल्या आहेत. मयत **लक्ष्मण नामदेव कानडे** यांना अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. त्यांचे मृत्युनंतर शासकीय तथा निमशासकीय कामकाजाकरीता अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

**३.** प्रस्तूतचा अर्ज दाखल झाल्यानंतर दिनांक ०२/१२/२०२५ रोजीचे ''दैनिक संघर्ष समाजवादाचा' या वर्तमानपत्रामध्ये नोटीस जाहीर करण्यात आली व सदरचे वर्तमानपत्र नि.क्र. १० वर दाखल आहे. **मयत लक्ष्मण नामदेव कानडे** यांचे मृत्यु प्रमाणपत्र **नि.क्र. १३** वर दाखल केले आहे.

**४.** उपरोक्त वर्तमानपत्रातील नोटीसीद्वारे जाहीर प्रगटन काढुन सर्व जनतेकडुन अर्जदार हे मयत **लक्ष्मण नामदेव कानडे** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत आक्षेप मागविणेत आले. परंतु आजतागायत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

**५.** अर्जदार क्र. ३ यांचे साक्ष सरतपासाचे शपथपत्र निशाणी १४ वर दाखल केले. तसेच अर्जदाराने साक्षीदार नामे– धनंजय राम कानडे यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. १५ वर दाखल केलेले आहे. अर्जदाराने पुरावा बंदची पुरसीस नि.क्र. १६ येथे दाखल केलेली आहे. मुळतःच अर्जास कोणीही आक्षेप घेतलेला नसल्याने साक्षीदारांचा सरतपास अबाधीत राहीला आहे.

**६.** उपरोक्त विवेचनाचा विचार करता अर्जदार हे मयत **लक्ष्मण नामदेव कानडे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे सकृतदर्शनी सिध्द झाले आहे. त्यामुळे अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) **अर्जदार क्र. १) सरुबाई लक्ष्मण कानडे, २) सचिन लक्ष्मण कानडे, ३) महेश लक्ष्मण कानडे** हे मयत **लक्ष्मण नामदेव कानडे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

३) नियमाप्रमाणे कोर्ट फी भरल्यानंतर अर्जदाराच्या नावे विहीत नमुन्यात वारस प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

VIVEK VITHALRAO NIVGHEKAR

Digitally signed by VIVEK VITHALRAO NIVGHEKAR
Date: 2026.03.25 16:56:27 +0530

**दिनांक– २५/०३/२०२६.**
**ठिकाण – तुळजापुर.**

**( व्ही. व्ही. निवघेकर )**
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर,**
**तुळजापूर, जि. धाराशिव.**

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Jr. Clerk | : A. M. Bahirmal |
| Court Name | : Shri. V.V. Nivghekar, Jt. CJJD Tuljapur. |
| Date | : 25-03-2026 |
| Presiding Officer on | : 25-03-2026 |
| Judgment uploaded on | : 25-03-2026 |